ePaper

## भारतात हिटलरची ‘एक देश-एक भाषा’ नीती : पृथ्वीराज चव्हाण



| वर्ष - 8 | अंक - 321 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

### आतील पानांत


- श्रेयसला संधी कशी मिळेल?
- रविंद्र जडेजाला मिळू शकते संधी
- गुरूजी संपत्ती असूनही लग्न होत नाही
- महामार्गावर ३२ तास वाहतूक कोंडी


www.mahaenews.com | सोमवार |, दि. 30 जून 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## राज्यात तापलेल्या प्रचंड राजकीय वातावरणानंतर हिंदीची सक्ती रद्द : ‘महायुती’ सरकारचा महत्त्वपूर्ण निर्णय : समिती स्थापन

# महायुतीचा यु-टर्न!

## मनसे, उबाठा गटाचा मोर्चाही रद्द : सत्ताधारी आणि विरोधकांच्या आरोपांच्या फैरी

| मुंबई | प्रतिनिधी | महाईन्यूज

**महाराष्ट्राच्या विधिमंडळ अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला रविवारी अनेक महत्त्वाच्या घटना घडल्या आणि ‘महायुती’ सरकारने यु-टर्न घेतल्याचे स्पष्ट झाले. महाराष्ट्र सरकारने हिंदी अनिवार्य करणारे दोन्ही जीआर अखेर मागे घेतले. स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही घोषणा केली. या निर्णयामुळे राज ठाकरे यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि उद्धव ठाकरे यांची शिवसेना यांनी आयोजित केलेला संभाव्य मोर्चाही रद्द करण्यात आला आहे.**



### आरोप, प्रत्यारोपाच्या फैरी..

या निर्णयाच्या आधी सत्ताधारी आणि विरोधक यांच्यामध्ये हिंदी सक्तीच्या मुद्द्यावर आरोप प्रत्यारोपाच्या अनेक फैरी झडल्या आणि एकूणच राजकीय वातावरण तापलेले दिसल्यानंतर सत्ताधारी ‘महायुती’ ने हिंदी सक्तीचे जीआर रद्द केले.

### मुख्यमंत्र्यांची पत्रकार परिषद..

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषद घेऊन ही घोषणा रद्द केली. पण, त्याचबरोबर काही महत्त्वपूर्ण निर्णय देखील घेतले. राज्याचे त्रिभाषा धोरण कायम असले तरी आता अधिक लवचिक असेल असे ते म्हणाले. विद्यार्थी कोणतीही भारतीय भाषा तिसऱ्या भाषेसाठी निवडू शकतात. इयत्ता पहिली, दुसरी मध्ये फक्त मौखिक शिक्षण देण्यात येईल आणिलेखन-वाचन पुढील टप्प्यात होईल.

### तज्ज्ञ समितीची स्थापना..

हा भाषा प्रश्न सोडवण्यासाठी आता अंतिम निर्णय होणार असून तो सर्व संबंधितांशी सल्लामसलत करूनच होईल. दरम्यान, मराठी भाषा ही अनिवार्यच आहे.मातृभाषेला संपूर्ण प्राधान्य कायम राहणार, असाही निर्णय झाल्याचे त्यांनी सांगितले. जनतेच्या, शिक्षकांच्या आणि भाषाप्रेमी संस्थांच्या मतांचा विचार करून सरकारने महत्त्वपूर्ण बदल केला आहे. आता विद्यार्थ्यांना भाषेच्या निवडीचा अधिकार मिळणार आहे हेच खरे शैक्षणिक स्वातंत्र्य आहे, असे सरकारतर्फे स्पष्ट करण्यात आले. त्रिभाषा धोरण लागू राहील, पण कोणत्याही भाषेची सक्ती केली जाणार नाही, असेही ते म्हणाले.



### निर्णय घेण्यापूर्वी काय घडले ?

पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना तिसरी भाषा हिंदी शिकवण्याच्या मुद्द्यावरुन राज्यातील वातावरण तापलेले असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठा निर्णय घेतला आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत हिंदी भाषेबाबतचा निर्णय मागे घेण्यात आल्याची माहिती फडणवीस यांनी दिली.फडणवीसांनी त्रिभाषा धोरणाचा जीआर रद्द केल्याची घोषणा केली आहे. त्रिभाषा सूत्राच्या संदर्भात कुठल्या वर्गापासून लागू करावी यासाठी राज्य सरकारच्या वतीने डॉ नरेंद्र जाधव यांच्या नेतृत्वाखाली समिती स्थापन करणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. या समितीच्या अहवालानंतर त्रिभाषा सूत्र लागू करणार असल्याचेही ते म्हणाले.

### मराठी माणसाची इच्छा..

दरम्यान, हिंदी सक्तीच्या या मुद्द्यावरून राज आणि उद्धव ठाकरे एकत्र यावेत, अशी मराठी माणसाची इच्छा होती. राज यांच्या शिवसेनेतील बंडानंतर मराठीच्या मुद्द्यावर पहिल्यांदाच राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकाच मोर्चात एकत्र येणार होते. विशेष म्हणजे राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी मोर्चाची वेगवेगळी तारीख जाहीर केली होती. पण नंतर दोघांनी एकच तारीख जाहीर केली. त्यामुळे दोन्ही ठाकरे बंधू एकत्र येणार असल्याने मराठी माणसात उत्साह होता. आता सरकारने हिंदी सक्तीविषयीचे दोन्ही शासन निर्णय रद्द केले आहेत. त्यामुळे दि. ५ जुलै रोजीचा मोर्चा रद्द करण्यात आला आहे.

### मोर्चा रद्द, मात्र उद्दीष्ट सफल..

महायुती सरकारने हिंदी सक्तीबाबतचे दोन्ही जीआर रद्द केल्यामुळे आता दि.५ जुलै रोजीच्या मोर्चाचे उद्दीष्ट एका प्रकारे साध्य झाले आहे. पण, उद्दीष्ट साध्य झाले असले तरी दि. ५ जुलै रोजी मोर्चा निघेलच, अशी घोषणा उद्धव ठाकरे यांनी केली आहे. फक्त या मोर्चाचे स्वरुप वेगळे असेल, असे त्यांनी सांगितले आहे.

### ठाकरे बंधूं एकत्र येण्याचा आशावाद संपलेला नाही..

माझी राज ठाकरे यांच्याशी थेट चर्चा चालू नसली तरी आमची चर्चा मात्र चालू आहे, असे उद्धव ठाकरे यांनी थेट सांगितले आहे. हे दोन्ही नेते एकत्र दिसण्याबाबत साशंकता व्यक्त केली जात असली तरी आगामी काळात महाराष्ट्राच्या राजकारणात हे दोन्ही नेते एकत्र येण्याबाबतचा आशावाद अजूनही संपलेला नाही. प्रामुख्याने मुंबई महानगरपालिका आणि राज्यातील स्थानिक संस्थांच्या निवडणुकांमध्ये ठाकरे बंधू एकत्र आले आणि त्यांनी ठाकरे ब्रँड साकारला तर राजकारणात मोठी उलथापालथ दिसून येईल असे राजकीय तज्ज्ञांचे मत आहे.

# ठाकरे बंधूंनी बेहराम पाड्यातून मोर्चा काढावा

## राज्याचे मत्स्य आणि बंदर विकासमंत्री नीतेश राणे यांची टीका

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**हिंदी सक्तीविरोधात मुंबईच्या मुख्य रस्त्यावरून मोर्चा काढण्याऐवजी ठाकरे बंधूंनी महमद अली रस्ता, बेहराम पाड्यातून मोर्चा काढावा. 'हिंदू'मध्ये फूट पाडण्यापेक्षा मुंबई-महाराष्ट्रात राहून ज्यांना मराठी बोलता येत नाही, त्यांना आधी मराठी शिकवा,' अशी टीका राज्याचे मत्स्य आणि बंदर विकासमंत्री नीतेश राणे यांनी रविवारी पत्रकारांशी बोलताना केली.**



ओडिशामधील पुरी येथील जगन्नाथ रथयात्रेच्या धर्तीवर आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ म्हणजेच इस्कॉन पुण्याच्या वतीने रथयात्रा काढण्यात आली. या रथयात्रेत मंत्री राणे सहभागी झाले होते, त्यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. हिंदी सक्तीविरोधात ठाकरे बंधूंनी गुरुवारी (५ जुलै) संयुक्त मोर्चाची हाक पुकारली होती. राणे म्हणाले, 'जावेद अख्तर, आमीर खान आणि राहुल गांधींसाठी हिंदी सक्ती महत्त्वाचा मुद्दा नाही का? त्यांना आधी मराठीत बोलायला लावा. राज्यात हिंदी सक्तीची नाहीच. हा केवळ हिंदूंमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न आहे. पहिलीच्या विद्यार्थ्याला तृतीय भाषा म्हणून संस्कृतचाही पर्याय उपलब्ध आहे. शिवसेना (ठाकरे गट) खासदार संजय राऊत यांनी २०२३ मध्ये दाखल केलेल्या मानहानीच्या फौजदारी तक्रारीप्रकरणी मुंबईतील माझगाव न्यायालयाने गुरुवारी भाजप नेते नितेश राणे यांना सुनावणीला उपस्थित राहण्यापासून कायमस्वरूपी सूट देण्यास गुरुवारी नकार दिला. त्याचवेळी राणे यांच्याविरुद्ध अजामीनपात्र वॉरंट बजावले. खटल्याच्या सुनावणीला अनुपस्थित राहिल्याबद्दल गेल्या महिन्यात न्यायालयाने राणे यांच्याविरुद्ध जामीनपात्र वॉरंट बजावले होते. त्यानंतर, २ जून रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान राणे यांनी सुनावणीला उपस्थित राहण्यापासून कायमची सूट मिळावी यासाठी अर्ज दाखल केला होता. या अर्जावर न्यायदंडाधिकारी ए. कुलकर्णी यांनी गुरुवारी निर्णय देताना तो फेटाळला. तसेच, राणे यांच्याविरुद्ध अजामीनपात्र वॉरंट काढून सुनावणी १८ जुलैपर्यंत तहकूब केली.दोन वर्षांपूर्वी, राणे यांनी राऊतांना साप म्हणून संबोधले होते. तसेच, राऊत हे उद्धव ठाकरे यांना सोडून त्याच वर्षी जूनपर्यंत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सामील होतील, असा आरोप केला होता. त्यानंतर,राऊत यांनी राणे यांच्याविरुद्ध मानहानीची फौजदारी तक्रार दाखल केली होती व बदनामीप्रकरणी कारवाईची मागणी केली होती. ओडिशामधील पुरी येथील जगन्नाथ रथयात्रेच्या धर्तीवर आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ म्हणजेच इस्कॉन पुण्याच्या वतीने रथयात्रा काढण्यात आली. या रथयात्रेत मंत्री राणे सहभागी झाले होते, त्यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. हिंदी सक्तीविरोधात ठाकरे बंधूंनी गुरुवारी (५ जुलै) संयुक्त मोर्चाची हाक पुकारली होती. राणे म्हणाले, 'जावेद अख्तर, आमीर खान आणि राहुल गांधींसाठी हिंदी सक्ती महत्त्वाचा मुद्दा नाही का? त्यांना आधी मराठीत बोलायला लावा. राज्यात हिंदी सक्तीची नाहीच. हा केवळ हिंदूंमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न आहे. पहिलीच्या विद्यार्थ्याला तृतीय भाषा म्हणून संस्कृतचाही पर्याय उपलब्ध आहे.

### संस्कृतचाही पर्याय उपलब्ध

शिवसेना (ठाकरे गट) खासदार संजय राऊत यांनी २०२३ मध्ये दाखल केलेल्या मानहानीच्या फौजदारी तक्रारीप्रकरणी मुंबईतील माझगाव न्यायालयाने गुरुवारी भाजप नेते नितेश राणे यांना सुनावणीला उपस्थित राहण्यापासून कायमस्वरूपी सूट देण्यास गुरूवारी नकार दिला. त्याचवेळी राणे यांच्याविरुद्ध अजामीनपात्र वॉरंट बजावले. खटल्याच्या सुनावणीला अनुपस्थित राहिल्याबद्दल गेल्या महिन्यात न्यायालयाने राणे यांच्याविरुद्ध जामीनपात्र वॉरंट बजावले होते. त्यानंतर, २ जून रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान राणे यांनी सुनावणीला उपस्थित राहण्यापासून कायमची सूट मिळावी यासाठी अर्ज दाखल केला होता. या अर्जावर न्यायदंडाधिकारी ए. कुलकर्णी यांनी गुरूवारी निर्णय देताना तो फेटाळला.

---

# बंगला बांधल्याशिवाय लग्न करायच नाही!

## त्यावेळी एक सीमेंटच पोत 27 रुपये 85 पैशांना होत :अजित पवार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था सारथी च्या माध्यमांतून युपीएससी आणि एमपीएससी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी उपस्थित निवड झालेल्या अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करतेवेळी अजित पवार म्हणाले.**




आता तुम्ही काही कालावधीत अधिकारी पदावर काम करणार आहात, सगळ्यांनी व्यवस्थित जबाबदारीने काम पार पाडा, पण कधी चुकून आपलं काही चुकलं तर त्या ठिकाणी मोठी बदनामी आपल्याला सहन करावी लागते. त्या गोष्टी होता कामा नये, तसेच तुमच्याकडे येणाऱ्या नागरिकांचे प्रश्न तुम्ही चांगल्या प्रकारे सोडवा सगळी लोक लांब गावातून तुमच्याकडे येतात कुणालाही काम न करता परत पाठवू नका, असा सल्ला त्यांनी अधिकाऱ्यांना दिला.तसेच ते पुढे म्हणाले, मी राजकीय जीवनाला सुरुवात केली होती, त्यावेळची एक गोष्ट आठवते ती म्हणजे ए आर अंतुले साहेबांचे मुख्यमंत्री पद गेले होते. १९७९/८० चा काळ असेल. त्यावेळी पुण्याचे जिल्हाधिकारी अजित निंबाळकर होते, सिमेंटचे खूप मोठ्या प्रमाणावर शॉर्टजे होते की, विचारायची सोयच नव्हती. अजित निंबाळकर यांच्या हातामध्ये सिमेंटच परमिट देण्याचे अधिकार होते, त्यामुळे मी निंबाळकर साहेबांकडे गेलो आणि म्हणालो, काटेवाडीमध्ये घर बांधायला काढले आहे. त्यासाठी सिमेंट पाहिजे असल्याचे त्यांना सांगितले. त्यावेळी मी मनामध्ये ठरवलं होत बंगला बांधल्याशिवाय लग्न करायच नाही. बायकोला पत्र्याच्या घरात आणू काय , असे अजित पवार म्हणताच उपस्थित नागरिकांमध्ये एकच हशा पिकला.तसेच ते पुढे म्हणाले, मला सीमेंटच परमिट देण्यात आलं, त्यावेळी एक सीमेंटच पोत २७ रुपये ८५ पैशांना होत, मला एक हजार पोती दिली आणि माझ घर बांधुन झाल. तसेच ज्यावेळी मी घराकडे पाहतो, तेव्हा माझ्या डोळ्यासमोर अजित निंबाळकर येत असतात,असे म्हणताच पुन्हा उपस्थितामध्ये हशा पिकला. आता तुम्ही काही कालावधीत अधिकारी पदावर काम करणार आहात, सगळ्यांनी व्यवस्थित जबाबदारीने काम पार पाडा, पण कधी चुकून आपलं काही चुकलं तर त्या ठिकाणी मोठी बदनामी आपल्याला सहन करावी लागते. त्या गोष्टी होता कामा नये, तसेच तुमच्याकडे येणाऱ्या नागरिकांचे प्रश्न तुम्ही चांगल्या प्रकारे सोडवा सगळी लोक लांब गावातून तुमच्याकडे येतात कुणालाही काम न करता परत पाठवू नका, असा सल्ला त्यांनी अधिकाऱ्यांना दिला.तसेच ते पुढे म्हणाले, मी राजकीय जीवनाला सुरुवात केली होती, त्यावेळची एक गोष्ट आठवते ती म्हणजे ए आर अंतुले साहेबांचे मुख्यमंत्री पद गेले होते. १९७९/८० चा काळ असेल. त्यावेळी पुण्याचे जिल्हाधिकारी अजित निंबाळकर होते.

### काटेवाडीमध्ये घर बांधायला काढले

सिमेंटचे खूप मोठ्या प्रमाणावर शॉर्टजे होते की, विचारायची सोयच नव्हती. अजित निंबाळकर यांच्या हातामध्ये सिमेंटच परमिट देण्याचे अधिकार होते, त्यामुळे मी निंबाळकर साहेबांकडे गेलो आणि म्हणालो, काटेवाडीमध्ये घर बांधायला काढले आहे. त्यासाठी सिमेंट पाहिजे असल्याचे त्यांना सांगितले. त्यावेळी मी मनामध्ये ठरवलं होत बंगला बांधल्याशिवाय लग्न करायच नाही.

## मास्टरस्ट्रोक! आमदार लांडगे यांच्या मागणीनंतर

# ‘हिंजवडी’ प्रश्नांवर तातडीने बैठक!

### मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव घेणार हिंजवडी परिसरातील ‘पाणीबाणी’वर आढावा

। पिंपरी चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मान्सूनपूर्व तसेच मोसमी पावसामुळे गेल्या महिन्याभरात हिंजवडी परिसरात अक्षरशः ‘पाणीबाणी’ निर्माण झाल्याची स्थिती होती. या समस्येमुळे या भागातील नागरिक, आयटीयन्स यांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागला. आयटी पार्कमधील कर्मचारी वर्ग तासंतास रस्त्यावर अडकून पडला. याशिवाय वारंवार होणारी वाहतूक कोंडी, मूलभूत सुविधांचा अभाव यामुळे वैतागलेल्या नागरिकांनी #UNCLOGHINJAWADIITPARK ही स्वाक्षरी मोहीम सुरू केल्यानंतर याची दखल घेत भाजपा आमदार महेश लांडगे यांनी घेतली थेट मुख्यमंत्र्यांना लक्ष घालण्याची विनंती केली. यावर तात्काळ कार्यवाही सुरु झाली असून, प्रधान सचिव यांनी बैठक लावली आहे.**




हिंजवडी आणि परिसरातील पायाभूत समस्या तसेच हिंजवडीचा पिंपरी-चिंचवड महापालिकेत समावेश करणे या मुद्द्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रधान सचिव यांनी तातडीने संबंधित सर्व विभागांना सोमवारी (दि 30) बैठकीसाठी बोलावले आहे.

दरम्यान, काही दिवसपूर्वी हिंजवडी परिसरात पाणी साचून नागरिकांचा खोळंबा होतो, गैरसोय होते. याला नक्की जबाबदार कोण? याचीही झाडाझडती या बैठकीच्या माध्यमातून घेतली जाणार आहे. मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव सोमवारी सायंकाळी पाच वाजता मुंबई मंत्रालयात याबाबत आढावा बैठक घेणार आहेत. बैठकीसाठी पिंपरी-चिंचवड, महानगरपालिका, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ पुणे जिल्हापरिषद, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि., टाटा मेट्रो, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांना बोलविण्यात आले आहे. वाकड पिंपरी चिंचवड रेसिडेंट डेव्हलपमेंट अँड वेल्फेअर असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी नुकतीच आमदार महेश लांडगे यांची भेट घेतली होती. त्यामध्ये हिंजवडीचा पिंपरी- चिंचवड महापालिकेत समावेश करावा आणि पायाभूत सुविधा शिक्षण करण्यासाठी मुख्यमंत्री यांचे लक्षवेधवे अशी मागणी केली होती.

> “पुणे व पिंपरी-चिंचवड शहराच्या आजुबाजुला असलेल्या पीएमआरडीए हद्दीमध्ये पायाभूत सोयी-सुविधा सक्षम करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही प्रयत्न करीत आहोत. वाहतूक समस्या, पावसाळी पाण्याचा निचरा व्यवस्था, कचरा समस्या आणि नागरी आरोग्य तसेच पर्यावरण संवर्धनासाठी सातत्यपूर्ण पुढाकार घेण्याची माझी भूमिका आहे. त्या दृष्टिकोनातून होत असलेली ही बैठक अत्यंत महत्त्वाची आहे.
> **- महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

---

## मोदीजींच्या दूरदृष्टीमुळे अर्थव्यवस्था वाढीला वेग-जावडेकर

### भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या नेतृत्वात ‘बुद्धिजीवी संमेलन’ मोठ्या उत्साहात संपन्न

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**“पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीच्या नेतृत्वाखाली भारताने केवळ प्रगतीच केली नाही, तर जागतिक पटलावर आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. ‘संकल्प ते सिद्धी’ हे अभियान म्हणजे या ११ वर्षांच्या अतुलनीय वाटचालीचा गौरव आहे.”**




“आज भारताची अर्थव्यवस्था वेगाने वाढत आहे, पायाभूत सुविधांमध्ये क्रांती घडत आहे आणि सामान्य माणसाच्या जीवनात सकारात्मक बदल होत आहेत. शिक्षण, आरोग्य, सुरक्षा आणि डिजिटल इंडियाच्या माध्यमातून सरकारने प्रत्येक स्तरावर काम केले आहे. ‘सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास, सबका प्रयास’ हे केवळ एक घोषवाक्य नसून, ते मोदी सरकारच्या कारभाराचे आणि भारताच्या विकासाचे मूलभूत तत्त्व आहे. पुढील काळातही देशाची ही विकासाची घोडदौड अशीच वेगाने सुरू राहील आणि भारत एका नव्या उंचीवर पोहोचेल, असा विश्वास माजी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर यांनी व्यक्त केला. केंद्र सरकारच्या ११ वर्षांच्या यशस्वी कार्यकाळावर प्रकाश टाकतांना ते बोलत होते. राष्ट्रीय समितीने सुरू केलेल्या ‘संकल्प ते सिद्धी’ अभियानांतर्गत भारतीय जनता पार्टी, पिंपरी-चिंचवडचे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या नेतृत्वात बुद्धीजीवी संमेलन’ शनिवारी, सायंकाळी हॉटेल कलासागर, कासारवाडी, येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाले. यावेळी, माजी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर यांनी प्रमुख वक्ते म्हणून उपस्थितांना संबोधित केले. भारताच्या विकासाची वाटचाल आणि पुढील दिशा यावर विचारमंथन करण्यासाठी आयोजित या संमेलनाला डॉक्टर, वकील, सीए, अभियंता अशा प्रतिष्ठित व्यक्तींनी उपस्थित राहून आपली मते व्यक्त केली. भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे, आमदार तथा बुद्धिजीवी संमेलनाचे आयोजक महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. बुद्धिजीवी संमेलनाचे संयोजक ॲड. गोरखनाथ झोळ, सहसंयोजक सीए बबन डांगले, दीपक भंडारी, चैतन्य पाटील, अमेय देशपांडे व डॉ. प्रताप सोमवंशी यांनी कार्यक्रमाच्या यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले. यावेळी, भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे, आमदार उमाताई खापरे, माजी खासदार अमर साबळे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, माजी महापौर उषा उर्फ माई ढोरे, माजी महापौर राहुल जाधव, दक्षिण आघाडी प्रदेशाध्यक्ष राजेश पिल्ले, प्रदेश सदस्य मोरेश्वर शेडगे, महेश कुलकर्णी, सरचिटणीस संजय मंगोडेकर, विजय उर्फ शीतल शिंदे, अजय पाताडे, शैला मोळक, महिला मोर्चा अध्यक्षा सुजाता पालांडे, शहर प्रवक्ते राजू दुर्गे, माजी उपमहापौर केशव घोळवे, माजी नगरसेवक विनायक गायकवाड, शैलेश मोरे, राजेंद्र लांडगे, उत्तम केंदळे, सागर गवळी, सुभाष चिंचवडे, यशवंत भोसले, माजी नगरसेविका योगिता नागरगोजे, माधवी राजापुरे, निर्मला कुटे, सविता खुळे, वैशाली खाडेय, भारती विनोदे, मंडल अध्यक्ष मोहन राऊत, ॲड.हर्षद नढे, सनी बारणे, गणेश ढोरे, सोमनाथ तापकीर, ॲड. योगेश सोनवणे, अमोल डोळस, शिवराज लांडगे, अजित बुर्डे, रामदास कुटे, धरम वाघमारे, जयदीप खापरे, मंगेश धाडगे, अनिता वाळूंजकर, काळुराम बारणे, विजय फुगे, संजय पटनी, हनुमंत लांडगे, ॲड. सय्यद सिकंदर, माणिकराव अहिरराव, अजित कुलथे, रवी देशपांडे, जवाहर ढोरे, महादेव कवितके, संतोष तापकीर, कैलास कुटे, विशाल वाळुंजकर, सचिन तापकीर, चेतन बेंद्रे, सागर फुगे, कैलास सानप, गणेश ढाकणे, सचिन राऊत, हरीश मोरे, प्रकाश लोहार, राकेश नायर, संजय कणसे, कविता हिंगे, दीपाली धनोकार, तेजस्विनी दुर्गे, राजश्री जायभाय, आशा काळे, पल्लवी पाठक, गीता महेंद्रू, नंदू भोगले, पोपट हजारे, भूषण जोशी यांच्यासह सर्व आघाड्यांचे पदाधिकारी - कार्यकर्ते उपस्थित होते.

#### मोदी सरकारने बजावलेली भूमिका

उपस्थित मान्यवरांनी पंतप्रधान मोदींच्या ११ वर्षांच्या कार्यकाळात देशाने विविध क्षेत्रांत केलेल्या प्रगतीची प्रशंसा केली. देशाच्या आर्थिक, सामाजिक आणि पायाभूत सुविधांच्या विकासात मोदी सरकारने बजावलेली भूमिका यावर मान्यवरांनी विचारमंथन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजक संजय मंगोडेकर यांनी मांडले. सूत्रसंचालन मोरेश्वर शेडगे यांनी तर आभार राजेश पिल्ले यांनी मानले.

# भारताकडून कूटनीतीचा खेळ, पाकवर भीक मागण्याची वेळ!






**'स्टेट'मेंट**

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांनी पहलगाममध्ये केलेल्या हत्याकांडानंतर भारताने 'ऑपरेशन सिंदूर' चे पाऊल उचलले आणि उट्टे काढले. त्या कारवाई मध्ये पाकिस्तानची पूर्णपणे जिरवली आणि आपल्याला पाहिजे तसे डाव भारताने टाकले.**

### सिंधू नदीचे पाणी अडवले..

केवळ बावीस तासांमध्ये भारताने पाकव्याप्त काश्मीर तसेच पाकिस्तानात घुसून दहशतवाद्यांचे नऊ अड्डे उद्ध्वस्त तर केलेच, पण दीडशेपेक्षा जास्त दहशतवाद्यांना कंठस्नान घातले. त्यानंतर युद्धविराम झाला खरा, पण सर्वात प्रमुख अट भारताने जी घातली ती म्हणजेL पाकिस्तानने काहीही आगळीक केली तरी त्यांच्यावर कारवाई करण्याचा एक हातचा भारताने राखून ठेवला. त्यानंतर मात्र पुलाखालून बरेच पाणी गेले आहे. काश्मीर मधून पाकिस्तान मध्ये वाहत नद्यांचे पाणी अडविण्याचा निर्णय भारताने घेतला आणि पाकिस्तानच्या तोंडचे पाणी पळाले !

### भारताचे चहुबाजूनी निर्बंध..

भारत सरकार एवढ्यावर थांबले नाही तर पाकिस्तानची चारही बाजूंनी कोंडी करण्याची एकही संधी भारताने सोडली नाही. मग तो व्यापार असो, भारतीय वस्तूंची निर्यात असो किंवा पाकिस्तानातून होणारी आयात असो. निर्बंध आणून या सर्व गोष्टींवर पाकिस्तानला अडचणीत आणायचे याचा चंग भारताने बांधला आणि कृती देखील केली.

### दहशतवादी बुरखा फाडला..

भारत एवढ्यावर थांबला नाही तर भारताची अनेक प्रतिनिधी मंडळे परदेशात जाऊन त्यांनी पाकिस्तानचा दहशतवादी बुरखा फाडण्याचे काम केले. दहशतवादाविरुद्ध भारताने घेतलेली भूमिका कशी योग्य आहे, हे पटवून देताना भारताने अनेक देशांना आपल्या बाजूने वळवून घेतले. या मुद्द्यावर सर्व आघाड्यांवर पाकिस्तान वर गल्लीतगात्र होण्याची वेळ आली आणि आता तर कोणत्याही दहशतवादी हालचाली त्यांनी केल्या तर त्याचा वचपा भारत काढणार, हे देखील त्यांना पुरेपूर माहित आहे.

### पाकिस्तान पुरता घायाळ..

या सर्व पार्श्वभूमीवर भारताने आता जे वार केले आहेत, त्यामुळे पाकिस्तान पुरता घायाळ झाला आहे. भारताची कूटनीती ही त्यांच्या समजण्यापलीकडे गेली असल्यामुळे पाकिस्तानचे सरकार, त्यांचे लष्कर आणि तेथील नेते हैराण होऊन डोक्याला हात लावून बसले आहेत. त्यांना जागतिक स्तरावर अक्षरशः हैराण करण्यात आले असून पाकिस्तानवर भीकेकंगाल होण्याची वेळ आली आहे.

### भारत-पाक संबंध ताणलेलेच..

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंध अजूनही ताणलेलेच आहेत. भारताने पाकिस्तानवर अनेक प्रकारचे निर्बंध लादले आहेत. यामुळे पाकिस्तानच्या खिशाला चांगलीच झळ बसत आहे, हे स्पष्ट दिसत आहे. भारताचा असा वार झाला आहे की ज्यात पाकिस्तान पुरता घायाळ होऊन निपचित पडला आहे. जम्मू - काश्मीरमधील पहलगाम हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंध कमालीचे ताणलेले आहेत. ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून भारताने पहलगाम हल्ल्याला प्रत्युत्तर दिले आहे. दरम्यान, सध्या या दोन्ही देशांनी एकमेकांवरील थेट हल्ले थांबवले आहेत, हीच फक्त समाधानाची बाब आहे. मात्र, पहलगाम हल्ल्यानंतर भारताने घेतलेल्या निर्णयामुळे पाकिस्तानला ज्या जखमा झालेल्या आहेत, त्या अजूनही भळभळत आहेत.पाकिस्तानला मोठा फटका बसत आहे. भडभळणाऱ्या या जखमांवर कोणते मलम लावावे, म्हणजे भारताची आक्रमकता कमी येईल, या विचारात पाकिस्तानचे नेते आहेत.

### पाकिस्तानला व्यापारात फटका..

पहलगाम हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तासोबतच्या व्यापारावर अनेक प्रकारचे निर्बंध आणले आहेत. भारताने पाकिस्तानी मालवाहू जहाजांना भारतीय बंदरांवर प्रवेश निषिद्ध केला आहे. पाकिस्तानहून येणारे तसेच पाकिस्तानी माल वाहून नेणारे कोणत्याही जहाजास भारताच्या बंदरावर येण्यास मज्जाव करण्यात आला आहे. परिणामी भारताच्या या निर्णयाचा पाकिस्तानला चांगलाच फटका बसत आहे. भारतामुळे पाकिस्तानी माल वाहून नेण्यासाठीची शिपिंग कॉस्ट वाढली आहे. त्याशिवाय, माल वाहतूक करण्यास आणि इप्सित स्थळी वस्तू पोहोचवण्यास उशीर होत आहे.]

### वाहतूक खर्चातही वाढ..

पाकिस्तानमध्ये प्रसिद्ध असलेल्या 'डॉन' या वृत्तपत्राने याबाबत वृत्त दिले आहे. भारताच्या भूमिकेबद्दल या वृत्तपत्राने मोठी चिंता व्यक्त केली असून भारताची ही भूमिका पाकिस्तानला परवडणारी नाही, असे म्हटले आहे. भारताने घातलेल्या निर्बंधांमुळे वाहतुकीसाठी लागणारा वेळ वाढला आहे. तसेच वाहतुकीच्या खर्चातही वाढ झालेली आहे, असे या वृत्तात म्हणण्यात आले आहे. 'कराची चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री' चे अध्यक्ष जावेद बिलवानी यांनी याबाबत प्रतिक्रिया दिली आहे. भारताच्या कारवाईमुळे मालवाहतूक करणारी महत्त्वाची जहाजे पाकिस्तानला येत नाहीत. त्यामुळे मालवाहतुकीसाठी साधारण ३० ते ५० दिवसांचा उशीर होत आहे. त्यामुळे जहाजामधील साहित्याचा विध्वंस होणे, नाशवंत मल खराब होणे आणि माल वेळेवर न पोहचल्यामुळे सर्वच प्रकारच्या संकटांना तोंड देण्याची वेळ पाकिस्तानवर आली आहे.

### 'शिंपिंग कॉस्ट'वाढली..


पाकिस्तानमध्ये होणाऱ्या आयातीसाठी आता फिडर जहाजांवर अवलंबून राहावे लागत आहेत. त्यामुळे वाहतुकीच्या खर्चात वाढ झाली आहे, असेही बिलवानी यांनी सांगितले आहे. भारताने घातलेल्या निर्बंधांमुळे शिपिंग कॉस्ट तसेच विम्याची रक्कमही वाढवण्यात आलेली आहे. असे असले तरी एकूण निर्यातीवरील प्रभाव नगण्य आहे, असा दावा त्यांनी केला आहे. या सर्व संकटांवर मात करण्याचा प्रयत्न पाकिस्तानकडून होत आहे, परंतु भारताने आखलेल्या कूटनीतीचा मोठा फटका मात्र पाकिस्तानला बसत आहे.

### पाकिस्तान विनंती करणार ?

दरम्यान, आता पाकिस्तानच्या खिशाला बसत असलेली ही झळ पाहता, तेथील सरकार भारताला आयात-निर्यातीवरील निर्बंध हटवण्याची विनंती करणार का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. भारताच्या सर्व प्रकारच्या कूटनीतीमध्ये भारताचे पारडे नेहमीच सकारात्मक बाजूकडे आहे, तर फटका मात्र पाकिस्तानला बसत आहे. तथापि, पाकिस्तान सरकार कोठेही नमती बाजू घेण्यास तयार नसल्यामुळे भारतालाही आपली आग्रही भूमिका कायम ठेवावी लागत आहे आणि त्या माध्यमातून पाकिस्तानला जेरीस आणणे सोपे जात आहे, हे मात्र नक्की !

---

**श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने »**



### पुण्यतिथी कशी साजरी करावी ?

**सत्पुरुषाची पुण्यतिथी कशी साजरी कराल ? या दिवशी जो नेम कराल तो सतत टिकण्यासारखा असतो. म्हणून आजपासून नामाशिवाय बोलायचे नाही असे आधीच ठरवा. नामांत राहण्याचा प्रयत्न करा, म्हणजे इथे आल्यासारखे काही केल्याचे श्रेय तरी मिळेल. इथे जो जो म्हणून आला त्याच्याजवळ आपण रहावे असे मला वाटते, पण तुम्हीच दार लावून ठेवले तर मी काय करणार ? पाहुणा घरी आला आणि त्याला दार उघडलेच नाही, तर तो काय करणार ? तसे, विषयात राहून दारे बंद करून ठेवू नका. नामाचा उच्चार कंठी ठेवा, म्हणजे विषयाचा घाला होणार नाही. आता कली मातत चालला आहे; त्याचा घाला चुकवायचा असेल तर नामावर विश्वास ठेवा. कोणीही काहीही सांगितले तरी नाम सोडू नका. जसे पाण्याचा मोठा लोंढा चालू झाला की एखाद्या स्थिर झाडाला दोराने बांधून ठेवलेली वस्तू वाहून जात नाही, तसे तुम्ही नामाची कास घट्ट धरलीत म्हणजे काळ काही करू शकणार नाही.**

**समर्थांनी नामाच्या समासात सांगितले आहे तसे, नाम हेच रूप असे समजून नाम घेत चला, म्हणजे रूप दिसेल. भगवंत हा आपल्या आतमध्ये प्रकट व्हायचा असल्यामुळे, नामस्मरणाच्या योगाने तो हळूहळू प्रकट होत जाणे हेच खरे हिताचे आणि कायमचे असते. डोक्यावर हात ठेवून चमत्कार होणे, काहीतरी तेज दिसणे, दृष्टांत होणे, इत्यादि गोष्टी तात्पुरत्या असतात. एखादा अशक्त, हाडकुळा मनुष्य लठ्ठ होण्यासाठी 'अंगाला सूज येऊ दे ' असे म्हणाला तर ते वेड्यासारखे होईल; याच्या उलट, त्याने नीट औषध घेतले तर तो कदाचित् लठ्ठ होणार नाही, पण त्याचे शरीर मात्र घट्ट होईल. तसेच परमार्थाच्या अनुभवाचे आहे; आणि हा अनुभव वाढीला लागावा याकरिताच पुण्यतिथी साजरी करावी. नामस्मरण सतत केल्याने आज ना उद्या भगवंताचे प्रेम येईलच येईल. प्रपंचाच्या गर्दीमध्ये भगवंताचे स्मरण ठेवण्यासाठी उत्सव, सण, पुण्यतिथ्या वगैरे असतात. खरोखर, प्रापंचिकाला कितीतरी पाश आहेत ! पैसा, लौकिक, मुले, मित्र, आप्त, वगैरे सर्व पाशच आहेत. अशा अनेक पाशांमध्येही नाम आवडीने घेणे किती कठीण आहे ! त्यामध्ये टिकणारा मनुष्य चांगला भक्कम असला पाहिजे. नामाच्या मागे भगवंताचे अस्तित्व आहे. म्हणून नामात सत्संगतीही आहे. मोबदल्याची अपेक्षा न करता मनापासून नाम घ्यायचे, आजच्या दिवसापासून ठरवा.**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# ‘ते’ दोन्ही शासन निर्णय रद्द!

## पहिलीपासून हिंदी सक्तीवरून सरकारचं एक पाऊल मागे

।मुंबई। प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**राज्य सरकारने पहिलीपासून हिंदी भाषा सक्ती करु नये अशी मागणी विरोधकांकडून गेल्या काही दिवसांपासून होत होती. सातत्याने यासाठी विरोधक आक्रमक झाले होते. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी एकत्र येऊन मोर्चा काढायचा निर्णयही घेतला होता. दरम्यान १६ एप्रिल आणि १७ जूनचे त्रिभाषा सूत्राचे दोन्ही निर्णय रद्द केल्याची घोषणा आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला केली आहे.**

आम्ही ही भूमिका दुसरा जीआर काढला त्यादिवशीही भूमिका मांडली. असे विषय सर्वानुमते करुन घ्यायचे आहेत. आमचे मंत्री दादा भुसे सगळ्यांशी चर्चा करतील. सगळ्यांसमोर वस्तुस्थिती ठेवतील. तिसरी भाषा शिकली नाही तर मराठी मुलांना मार्क्स मिळणार नाहीत. मात्र इतर मीडियामचे लोक पुढे जातील. मराठी सक्तीची आहे, गुजराती मीडियमवाल्यांना मराठी आणि इंग्रजी अनिवार्य आहे. आपल्या मराठी मुलांना क्रेडिटचे गुण मिळणार नाहीत. प्रवेशाचा विषय येईल तेव्हा मराठी मुलं मागे पडतील. त्यामुळे ही सगळी वस्तुस्थिती नेत्यांसमोर मांडावी, अभ्यासकांसमोर मांडावी, नवीन नेते आहेत त्यांच्यासमोर मांडावी त्यानंतर सांगोपांग निर्णय घ्यावा असं आम्ही दादा भुसेंना सांगितलं. मला वाटतं की चुकीच्या पद्धतीचं राजकारण करणं चाललं आहे. मंत्रिमंडाळाच्या बैठकीत आम्ही सांगोपांग चर्चा केली. त्रिभाषा सूत्राच्या संदर्भात ती कुठल्या वर्गापासून लागू करावी, मुलांना काय पर्याय द्यावा याचा निर्णय करण्यासाठी राज्य सरकारच्या वतीने डॉ. नरेंद्र जाधव यांच्या नेतृत्वात एक कमिटी करण्यात येईल. डॉ. नरेंद्र जाधव कुलगुरु होते, शिक्षण तज्ज्ञ म्हणून त्यांना आपण ओळखतो. काही इतरही



सदस्य त्या समितीत असतील. १६ एप्रिल २०२५ आणि १७ जून २०२५ हे दोन्ही शासन निर्णय आम्ही रद्द कऱण्याचा निर्णय घेतला आहे.

नरेंद्र जाधव समितीचा अहवाल आल्यानंतर आम्ही पुढील निर्णय जाहीर करु असं आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं आहे.नरेंद्र जाधव समिती माशेलकर समितीच्या अहवालाचा अभ्यास करेल, ज्यांचं या सूत्राबाबत दुमत आहे त्यांचंही म्हणणं ऐकून घेईल. त्यानंतर आपल्या विद्यार्थ्यांच्या हिताचा निर्णय या समितीच्या माध्यमातून येईल आणि तो राज्य सरकार स्वीकारेल. असा निर्णय आम्ही मंत्रिमंडळात घेतला आहे. आमच्यासाठी मराठी आणि मराठी विद्यार्थी महत्त्वाचा आहे. आमची नीती मराठी केंद्रीत असेल, विद्यार्थी केंद्रीत असेल. यात आम्हाला कुठल्याही प्रकारचं राजकारण करायचं नाही. अधिवेशन सुरु होणार आहे त्यात आम्ही १२ विधेयकं प्रस्तावित केली आहेत अशीही माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली.CY: पावसाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला महायुती सरकारने आज पत्रकार परिषद घेऊन त्रिभाषा सूत्राबद्दल सरकारची भूमिका स्पष्ट केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी त्रिभाषा सूत्रासंदर्भातील दोन्ही शासन निर्णय रद्द केल्याचे जाहीर केले. यानंतर आता मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांनी समाधान व्यक्त करत सरकारला उशिरा सुचलेले शहाणपण आहे, अशी भूमिका सोशल मीडिया पोस्टद्वारे मांडली. राज ठाकरे यांनी पोस्टमध्ये लिहिले, इयत्ता पहिलीपासून तीन भाषा शिकवण्याच्या नावाखाली हिंदी भाषा लादण्याचा निर्णय एकदाचा मागे घेतला. सरकारने या संबंधातील २ जीआर रद्द केले. याला उशिरा आलेलं शहाणपण म्हणता येणार नाही, कारण ही सक्ती फक्त आणि फक्त मराठी जनतेच्या रेट्यामुळे मागे घेतली गेली.

### मोर्चा झाला असता तर...

हिंदी भाषेसाठी सरकार इतका अट्टाहास का करत होतं आणि यासाठी सरकारवर नक्की कुठून दबाव होता, हे मात्र अजून गूढच आहे.पण महाराष्ट्रात विद्यार्थ्यांनी हिंदी शिकावीच म्हणून तीन भाषा लादण्याचा जो प्रयत्न होता तो एकदाचा हाणून पाडला गेला आणि यासाठी महाराष्ट्रातील तमाम जनतेचं अभिनंदन. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने एप्रिल २०२५ पासून या विषयावर आवाज उठवला होता आणि तेंव्हापासून हा मुद्दा तापायला लागला. त्यानंतर एक एक राजकीय पक्ष आवाज उठवायला लागले. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने पक्षविरहित मोर्चा काढायच्या ठरवल्यावर अनेक राजकीय पक्षांनी, संघटनांनी त्यात सहभागी होण्याची तयारी दाखवली. हा मोर्चा जर झाला असता तर इतका विशाल झाला असता की संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळाची आठवण व्हावी. कदाचित या एकजुटीचा धसका सरकारने घेतला असेल.

---

# फडणवीस यांनी घेतलेला शहाणपणाचा निर्णय

## हिंदी सक्तीचा निर्णय मागे घेताच संजय राऊतांची पोस्ट चर्चेत

।मुंबई। प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**राज्यात गेल्या काही दिवसांपासून पहिलीच्या इयत्तेपासून हिंदी भाषा शिकवण्याच्या सरकारच्या निर्णयावर चर्चा सुरू होत्या. यादरम्यान आज राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषद घेत हिंदी सक्तीसंबंधीचा आदेश रद्द करण्यात येत असल्याची घोषणा केली आहे. यानंतर राज्यातील राजकीय वर्तुळातून यासंदर्भात प्रतिक्रिया येण्यास सुरूवात झाली आहे.**




शिवसेना (ठाकरे) पक्षाचे नेते संजय राऊत यांनी सोशल मीडियाल प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट करत हा मराठी एकजुटीचा विजय असल्याचे म्हटले आहे.राज्यातील शाळेत हिंदी सक्ती केली जात असल्याच्या विरोधात ५ जुलै रोजी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आणि उद्धव ठाकरे यांनी एकत्र येते ५ जुलै रोजी मुंबईत सर्व पक्षीय मोर्चा काढण्याची घोषणा केली होती. या मोर्चात राज्यातील सर्व मराठी नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले होते. आज सर्व विरोधी पक्षांच्या नेत्यांनी एकत्र येते यासंबंधीच्या सरकारी आदेशाची होळी देखील केली होती. मात्र दोन्ही ठाकरे बंधूंचा मोर्चा निघण्याच्या आधीच राज्य सरकारने याबद्दल मोठा निर्णय घेतला आहे. आज (रविवार) सायंकाळी पत्रकार परिषद घेत हा निर्णय रद्द करण्यात आल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले. ज्यानंतर संजय राऊतांनी पोस्ट करत प्रतिक्रिया दिली आहे.“हिंदी सक्तीचा सरकारी आदेश रद्द! हा मराठी एकजुटीचा विजय, ठाकरे एकत्र येणार याचा धसका, ५ जुलैचा एकत्रीत मोर्चा आता निघणार नाही;पण.. ठाकरे हाच ब्रँड! (फडणवीस यांनी घेतलेला शहाणपणाचा निर्णय. छान),” अशी पोस्ट शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे नेते संजय राऊत यांनी केली आहे. राज्य सरकारच्या या निर्णयानंतर मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी देखील मोठी पोस्ट लिहिली आहे.“इयत्ता पहिलीपासून तीन भाषा शिकवण्याच्या नावाखाली हिंदी भाषा लादण्याचा निर्णय एकदाचा मागे घेतला.

### ठाकरे हाच ब्रँड!

सरकारने या संबंधातील २ जीआर रद्द केले. याला उशिरा आलेलं शहाणपण म्हणता येणार नाही, कारण ही सक्ती फक्त आणि फक्त मराठी जनतेच्या रेट्यामुळे मागे घेतली गेली. हिंदी भाषेसाठी सरकार इतका अट्टाहास का करत होतं आणि यासाठी सरकारवर नक्की कुठून दबाव होता, हे मात्र अजून गूढच आहे.पण महाराष्ट्रात विद्यार्थ्यांनी हिंदी शिकावीच म्हणून तीन भाषा लादण्याचा जो प्रयत्न होता तो एकदाचा हाणून पाडला गेला आणि यासाठी महाराष्ट्रातील तमाम जनतेचं अभिनंदन. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने एप्रिल २०२५ पासून या विषयावर आवाज उठवला होता आणि तेंव्हापासून हा मुद्दा तापायला लागला. त्यानंतर एक एक राजकीय पक्ष आवाज उठवायला लागले. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने पक्षविरहित मोर्चा काढायच्या ठरवल्यावर अनेक राजकीय पक्षांनी, संघटनांनी त्यात सहभागी होण्याची तयारी दाखवली.

# गुरुजी संपत्ती असूनही लग्न होत नाही!

## साहिबा बानोनं डाव साधला, वाचा भयंकर गुन्ह्याची कहाणी

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**वय वाढत चाललं आहे, लग्न होत नाही. नोकरी आहे, जमीनजुमला आहे, तरीही लग्न होत नाही", अशी खंत ४५ वर्षीय व्यक्तीने कथावाचक अनिरुद्धाचार्य यांच्याकडे व्यक्त केली. या संवादाचा व्हिडीओ व्हायरल झाला. यानंतर सुरू झाला एका गंभीर गुन्ह्याचा प्रवास. जबलपूरमधील इंद्रकुमार तिवारी यांचं लग्न होत नसल्याचं हेरून उत्तर प्रदेशमधील एका टोळीनं त्यांना सोशल मीडियावरून जाळ्यात ओढलं. खोटं लग्न करून त्यांच्याकडील मुद्देमाला लुटला आणि तिवारी यांचा खून केला. तब्बल महिन्याभराने या गुन्ह्याची उकल करण्यात जबलपूर पोलिसांना यश आले आहे.**



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, इंद्रकुमार तिवारी यांचा लग्नासंबंधी प्रश्न विचारणारा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर आरोपींनी त्यांच्याशी संपर्क साधला. साहिबा बानो या मुलीचे खोटे कागदपत्र तयार करून तिचे नाव खुशी तिवारी असल्याचे भासवले आणि इंद्रकुमार यांना लग्नासाठी उत्तर प्रदेशच्या कुशीनगर येथे बोलावले.इंद्रकुमार जबलपूर येथील राहणारे होते. त्यांच्या आई-वडिलांचे निधन झालेले असून त्यांचे जवळचे नातेवाईक नाहीत. ते शाळेत शिक्षक असून नोकरीबरोबर शेतीही करतात. ३० मे रोजी कुशीनगर येथे लग्नासाठी जात असल्याचे त्यांनी शेजारीपाजारी आणि दुरच्या नातेवाईकांना कळवले होते.लग्न करण्यासाठी इंद्रकुमार यांनी एक एकर जमीन गहाण ठेवली. त्यातून त्यांनी होणाऱ्या पत्नीसाठी दागिने विकत घेतले, तसेच दीड लाख रुपयांची रोकड घेऊन ते कुशीनगर येथे पोहोचले. तिथे गेल्यानंतर ५ जून पर्यंत ते मित्रांच्या संपर्कात होते. त्यानंतर त्यांचा फोन स्विच ऑफ झाला.इंद्रकुमार यांचा फोन लागत नसल्यामुळे जबलपूरमधील त्यांचे मित्र आणि दुरच्या नातेवाईकांना संशय आला.

तीन दिवस वाट पाहिल्यानंतर ८ जून रोजी त्यांनी जबलपूरच्या पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी इंद्रकुमार यांचा फोन ट्रॅक करत पुढील तपास सुरू केला. तसेच इंद्रकुमार यांचा फोटो कुशीनगर येथील पोलीस ठाण्यात पाठवून माहिती देण्याची विनंती केली.२७ जून रोजी कुशीनगर येथील उपासपूर गावात एक अज्ञात मृतदेह सापडल्याची माहिती जबलपूर पोलिसांना देण्यात आली. जबलपूर पोलिसांनी मृतदेहाची ओळख पटवली असता तेच इंद्रकुमार असल्याचे लक्षात आले. मात्र इंद्रकुमार यांच्याकडील दागिने, पैसे आणि त्यांचा मोबाइल आढळून आला नाही. यामुळे हा हत्येचा प्रकार असल्याचा संशय पोलिसांना आला. जबलपूरमधील मझौली पोलीस ठाण्याचे प्रमुख जेपी द्विवेदी यांनी सखोल तपास करत कौशल गौड नामक आरोपीला कुशीनगर येथून अटक केली आहे. तसेच इतर आरोपींचा शोध सुरू आहे. खुशी तिवारी नावाने लग्नाचं आमिष दाखविणारी साहिबा बानोही फरार असून पोलीस तिचा शोध घेत आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, इंद्रकुमार तिवारी यांचा लग्नासंबंधी प्रश्न विचारणारा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर आरोपींनी त्यांच्याशी संपर्क साधला. साहिबा बानो या मुलीचे खोटे कागदपत्र तयार करून तिचे नाव खुशी तिवारी असल्याचे भासवले आणि इंद्रकुमार यांना लग्नासाठी उत्तर प्रदेशच्या कुशीनगर येथे बोलावले. इंद्रकुमार जबलपूर येथील राहणारे होते.

### 19 दिवसांनी आढळला मृतदेह

दरम्यान इंद्रकुमार तिवारी यांच्या हत्येनंतर त्यांच्या गावात हळहळ व्यक्त होत आहे. इंद्रकुमार यांच्या आई-वडिलांचे अनेक वर्षांपूर्वी निधन झाले होते. भाऊ-बहीणही नसल्यामुळे त्यांना एकटे वाटायचे. ते अतिशय शांत स्वभावाचे सज्जन गृहस्थ होते, असेही ग्रामस्थांनी सांगितले.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, इंद्रकुमार तिवारी यांचा लग्नासंबंधी प्रश्न विचारणारा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर आरोपींनी त्यांच्याशी संपर्क साधला. साहिबा बानो या मुलीचे खोटे कागदपत्र तयार करून तिचे नाव खुशी तिवारी असल्याचे भासवले आणि इंद्रकुमार यांना लग्नासाठी उत्तर प्रदेशच्या कुशीनगर येथे बोलावले.इंद्रकुमार जबलपूर येथील राहणारे होते. त्यांच्या आई-वडिलांचे निधन झालेले असून त्यांचे जवळचे नातेवाईक नाहीत. ते शाळेत शिक्षक असून नोकरीबरोबर शेतीही करतात.

# महामार्गावर ३२ तास वाहतूक कोंडी!

## तीन जणांचा वाटेतच मृत्यू; नेमकी कुठं घडली घटना?

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**देशातील वेगवेगळ्या शहरात वाहतूक कोंडीची समस्या वाढताना पाहायला मिळत आहे. यादरम्यान एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. मध्यप्रदेशातील इंदूर-देवास महामार्गावर सुमारे ८ किमी लांबीच्या मोठ्या वाहतूक कोंडीत अडकून गुरूवार आणि शुक्रवार दरम्यान ३० तासांत किमान तीन जणांचा मृत्यू झाला.**



ही वाहतूक कोंडी गुरुवारी संध्याकाळी सुरू झाली आणि शुक्रवारी रात्रीपर्यंत राहिली. या वाहतूक कोंडीमुळे ४,००० हून अधिक वाहने या मार्गावर अडकून पडली होती.

या प्रकारामुळे शहरातील रस्ते आणि वाहतूक व्यवस्थापन व्यवस्थेबद्दल गंभीर चिंता व्यक्त केल्या जात आहेत.प्राथमिक माहितीनुसार ही वाहतूक कोंडी ही प्रामुख्याने महामार्गाचे काम सुरू असल्याने आणि मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी पाणी साचल्याने झाली होती असे वृत्त हिंदुस्तान टाईम्सने दिले आहे. वाहतूक ही एका लहान सर्व्हिस रोडवर वळवण्यात आली होती, ज्यामुळे मोठ्या प्रमाणात गर्दी झाली.

जवळपासच्या गावांमधून पर्यायी मार्ग नसल्याने परिस्थिती अत्यंत बिकट बनली. वाहतूक कोंडीतील पहिला बळी हे संदीप पटेल (३२) ठरले, यांना रुग्णालयात घेऊन जात असताना वाटेत हृदयविकाराचा झटका आला.संदीप यांच्या काकांनी दिलेल्या माहितीनुसार, संदीपने छातीत दुखत असल्याची तक्रार केली होती आणि त्यानंतर त्यांना रुग्णालयात नेले जात होते, परंतु गाडी वाहतूक कोंडीत अडकली आणि त्यांची प्रकृती बिघडली. रुग्णालयात त्यांना मृत घोषित करण्यात आले.

याबरोबरच कमल पांचाल (६२) आणि बलराम पटेल (५५) यांच्या देखील मृत्यूची नोंद झाली आहे. "आम्ही दीड तास वाहतूक कोंडीत अडकलो होते. यादरम्यान माझ्या वडीलांना अस्वस्थ वाटू लागलं, त्यांनी जड वाटत असल्याची तक्रार केली आणि त्यांना कारमध्येच चक्कर आली.

### पोलिसांवर कारवाई करावी

त्यांना देवास येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले, जेथे त्यांना मृत घोषित करण्यात आले," असे कमल यांचा मुलगा विजय पांचाल यांनी सांगितले.यादरम्यान इंदोरचे कलेक्टर आशीष सिंह यांनी एनएचएआय, आयएमसी, वाहतूक पोलिस आणि पीडब्ल्यूडीच्या अधिकाऱ्यांना कोणत्याही अडथळ्याशिवाय वाहतूक सुरळीत करण्याचे निर्देश दिले. दरम्यान या वाहतूक कोंडीच्या मुद्द्यावर विरोधी पक्ष काँग्रेसकडून टीका करण्यात आली आहे."बायपासवर गेल्या काही दिवसांपासून मोठी वाहतूक कोंडी झाली आहे. तीन जणांचा मृत्यू झाला आहे. वाहतूक सुरळीत सुरू ठेवण्यात अपयशी ठरलेल्या प्रशासकीय अधिकाऱ्यांवर आणि पोलिसांवर कारवाई करावी," असे काँग्रेस प्रवक्ते अमित चौरसिया म्हणाले आहेत.

# ईशा मालवीयने शेअर केला हटके डान्स व्हिडीओ

मराठी संगीत विश्वात सध्या एका गायकाच्या नावाची चांगलीच चर्चा सुरू आहे, तो म्हणजे गायक संजू राठोड. संजू राठोडच्या 'शेकी' या लोकप्रिय गाण्याने सर्वत्र धुमाकूळ घातला आहे. सोशल मीडियावरील रील्स आणि शॉर्ट्सवर हे गाणं गेल्या अनेक दिवसांपासून ट्रेंडिंगमध्ये आहे. जिथे पाहावं तिथे याच गाण्याची धून ऐकायला मिळत आहे. हिंदी 'बिग बॉस' फेम ईशा मालवीयने या गाण्यात केलेल्या डान्सने गाण्याची लोकप्रियता आणखीनच वाढवली आहे. या गाण्यातील तिची हुकस्टेप आणि याच हुकस्टेप्सवरील रील व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. त्यामुळे संजू राठोडचं 'शेकी' हे गाणं इतकं व्हायरल होण्यामागे ईशा मालवीयचीही तितकीच मेहनत आहे.मराठी मनोरंजन विश्वासह अनेक बॉलीवूड कलाकार संजूच्या 'शेकी' गाण्यावर थिरकताना दिसत



आहेत. अशातच एका ज्येष्ठ मराठी अभिनेत्रीलादेखील या गाण्यावर थिरकण्याचा मोह आवरता आलेला नाही. या अभिनेत्री म्हणजे शुभांगी लाटकर. शुभांगी लाटकर यांनी आजवर आपल्या अभिनयाद्वारे हिंदीसह मराठी प्रेक्षकांचे मनोरंजन केलं आहे.आजवर अनेक मराठी मालिका व चित्रपटामधून त्या प्रेक्षकांच्या भेटीला आल्या आहेत. अभिनयाने चर्चेत राहणाऱ्या शुभांगी लाटकर सोशल मीडियावरही तितक्याच सक्रीय असतात. सोशल मीडियावर त्या अनेक फोटो व व्हिडीओद्वारे चाहत्यांच्या संपर्कात राहत असतात. अशातच त्यांनी 'शेकी' गाण्यावर हटके डान्स व्हिडीओ केला आहे.एका ट्रेंडिंग गाण्याचा हा निव्वळ मोह आहे" असं कॅप्शन देत शुभांगी यांनी त्यांचा 'शेकी'वरचा डान्स व्हिडीओ शेअर केला आहे. त्यांच्या या डान्स व्हिडीओला १ लाख ३६ हजारहून अधिक लोकांनी पसंती दर्शवली आहे


## जॅकी श्रॉफ आजही चाळीला भेट देतात

ज्येष्ठ बॉलीवूड अभिनेते जॅकी श्रॉफ यांनी हिंदी चित्रपटसृष्टीत यश मिळवण्यापूर्वी खूप संघर्ष करावा लागला होता. त्यांनी मुंबईतील एका चाळीत आयुष्याची ३३ वर्षे घालवली. जॅकी श्रॉफ आजही अनेकदा त्या चाळीला भेट देतात. आता त्यांनी चाळीत ज्या खोलीत ते राहायचे ती भाड्याने घ्यायची इच्छा व्यक्त केली आहे. जॅकी श्रॉफ यांचं बालपण फार हलाखीचं होतं. एकेकाळी त्यांनी शेंगदाणे विकले, चित्रपटाची तिकिटंही विकली होती. जॅकी श्रॉफ व त्यांचे कुटुंब मुंबईच्या तीन बत्ती चाळीत राहायचे. जॅकी या चाळीतच लहानाचे मोठे झाले. फिल्म इंडस्ट्रीत यश मिळवल्यानंतरही ते काही वर्षे या चाळीतच राहिले होते. नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत जॅकी यांनी चाळीबद्दलच्या त्यांच्या भावना व्यक्त केल्या.३३ वर्षे चाळीतील ज्या खोलीत घालवली, ती खोली भाड्याने घ्यायची आहे, पण घरमालक तयार होत नसल्याचं त्यांनी सांगितलं. जॅकी श्रॉफ यांनी चाळीत राहण्याच्या आठवणींना उजाळा दिला. तसेच चाळीत एक वेगळीच ऊर्जा आहे. अजूनही ते कधीकधी चाळीला भेट देतात, फिरतात आणि तिथे काही वेळ घालवतात, असं त्यांनी नमूद केलं.विकी लालवानीला दिलेल्या मुलाखतीत जॅकी श्रॉफ यांना विचारण्यात आलं की ते चाळीतील त्यांची खोली परत भाड्याने घेण्यासाठी प्रयत्न करत आहेत का? उत्तर देत ते म्हणाले, "हो मी प्रयत्न करत आहे, पण मालक मला ती खोली परत देत नाही. त्याला वाटतं की त्याने ती खोली मला दिल्यास... आणि मी त्याला म्हणतो, 'भावा, मी ती घेऊन पळून जाणार नाही'. तो मला ती खोली देत नाहीये. मी त्याला सांगितलं की या खोलीचं भाडं मी देईन. आता तिथे ४ जण राहत आहेत, ते जे भाडं देतात तेच मी तुला देईन, पण तो तयार होत नाहीये."भावाच्या निधनानंतर आईने ती खोली सोडली होती, पण मनात अजून त्या जागेच्या आठवणी आहेत, असं जॅकी श्रॉफ यांनी सांगितलं.



## अखेर 2 वर्षांची मेहनत फळाला आली...

'ठरलं तर मग' मालिकेत सध्या सायली आणि अर्जुन आश्रम केससंदर्भातील पुरावे शोधण्यासाठी दिवसरात्र मेहनत घेत असल्याचं पाहायला मिळत आहे. विलासचा खून झाल्यावर महिपतने या केससंदर्भातील सगळे पुरावे नष्ट केलेले असतात. मात्र, नव्याने तपास केल्यावर अर्जुनला आश्रमात पेडंटचा अर्धा तुकडा सापडलेला असतो. आश्रमात सापडलेला पेडंटचा तुकडा साक्षी शिखरेचा असणार याची अर्जुनला शंभर टक्के खात्री असते. त्यामुळे काही करून साक्षी-महिपतच्या घरी जाऊन या पेडंटचा उरलेला अर्धा तुकडा शोधला पाहिजे असं अर्जुन ठरवतो. यासाठी सायली वेश बदलून साक्षी शिखरेच्या घरी सुद्धा जाते.सायली पार्लरचं काम करण्यासाठी साक्षीच्या घरी जाते. पण, साक्षीला संशय येण्याच्या आधी ती तिथून काढता पाय घेते. आता महिपत आणि साक्षीच्या घरी पुन्हा एकदा कसं जायचं असा विचार अर्जुन करत असतो. एवढ्यात शहरातील एका बिझनेस कार्यक्रमात सगळ्या मान्यवरांना आमंत्रित केल्याचं अर्जुनला त्याच्या वडिलांकडून समजतं. हीच संधी साधून आपण महिपतच्या घरी जाऊयात असं तो बायकोला सांगतो.सायली-अर्जुनला या कामात चैतन्य देखील मदत करत असतो. साक्षीच्या खोलीत शोधाशोध केल्यावर अखेर २ वर्षांनी अर्जुनला आश्रम केससंदर्भातील मोठा पुरावा सापडणार आहे. साक्षीच्या घरी शोधाशोध केल्यावर या दोघांना तिचं अर्ध पेडंट सापडतं. अर्जुन आणि सायली दोन्ही तुकडे जुळवतात, ज्यामुळे S अक्षर तयार होतं. पेडंट हाती लागल्यावर अर्जुन प्रचंड खूश होतं. या दोघांची २ वर्षांची मेहनत सार्थकी लागते.पेडंट हाती लागताच अर्जुन बायकोला म्हणतो, "आपली २ वर्षांची मेहनत फळाला आली. आता पिछेहाट नाही, आता वेळ आहे निकालाची..." अर्जुनच्या हाती पुरावा लागल्यामुळे 'ठरलं तर मग' मालिकेत पुन्हा एकदा कोर्टरुम ड्रामा सुरू होणार आहे.



## शेफाली जरीवालाला त्या औषधांमुळे आला हार्ट अटॅक?

अभिनेत्री शेफाली जरीवालाचे वयाच्या ४२ व्या वर्षी निधन झाले. तिचे कुटुंबीय, जवळचे मित्र आणि नातेवाईकांनी तिला अखेरचा निरोप दिला. शेफाली जरीवालाचा पती पराग त्यागीने तिच्या मृत्यूबद्दल पहिल्यांदाच माध्यमांशी संवाद साधला आणि तिच्यासाठी प्रार्थना करण्याची विनंती केली. दुसरीकडे, पोलीस अभिनेत्रीच्या मृत्यूचा तपास करत आहेत.

शेफाली जरीवालाचे हार्ट अटॅकने निधन झाले आहे. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, शेफाली जरीवालाच्या घरात अनेक औषधं सापडली आहेत. काही वर्षांपूर्वी शेफालीनेही प्लास्टिक सर्जरी केली होती, त्यानंतर ती तरुण दिसण्यासाठी सतत अँटी-एजिंग इंजेक्शन्स घेत होती. पोलिसांना संशय आहे की इतकी औषधं आणि अँटी-एजिंग इंजेक्शन्स शेफाली जरीवालाच्या हृदयविकाराचे कारण असू शकतात, परंतु ते शेफाली जरीवालाच्या पोस्टमॉर्टम रिपोर्टची वाट पाहत आहेत, त्यानंतरच मृत्यूचे खरे कारण कळेल.शेफाली अँटी-एजिंग ट्रीटमेंट घेत होती, म्हणजेच ती तरुण दिसण्यासाठी काही औषधं घेत होती. शेफाली दोन औषधं घेत होती, त्यापैकी एक व्हिटॅमिन सी आणि दुसरे ग्लुटाथिओन होय. पण या औषधाचा हृदयाशी काहीही संबंध नाही. ही औषधे त्वचा गोरी व्हावी यासाठी घेतली जातात, त्याचा परिणाम फक्त त्वचेवर होतो, अशी माहिती डॉक्टरांनी दिली. यासंदर्भात एबीपी लाइव्हने वृत्त दिलं आहे. शेफाली जरीवालाने शुक्रवारी घरी सत्यनारायणाची पूजा केली होती. संध्याकाळी ६ वाजल्यानंतर तिची प्रकृती बिघडू लागली. शेफालीचा रक्तदाब वाढला आणि ती बेशुद्ध पडली, त्यानंतर तिला पती पराग त्यागीने अंधेरी येथील बेली व्ह्यू रुग्णालयात नेलं.

# श्रेयसला संधी कशी मिळेल?

## श्रेयस अय्यरला कसोटी संघात स्थान मिळालं नाही

**।मुंबई। प्रतिनिधी : महाईन्यूज।**

**भारतीय संघ सध्या इंग्लंड दौऱ्यावर आहे. दोन्ही संघांमध्ये पाच कसोटी सामन्यांची मालिका सुरू आहे. या दौऱ्यासाठी निवडण्यात आलेल्या संघात युवा खेळाडूंना संधी देण्यात आले आहे. ज्यावेळी भारतीय घोषणा करण्यात आली. त्यावेळी श्रेयस अय्यरचं नाव संघात नव्हतं. हे पाहून अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला. कारण श्रेयसने आयपीएल आणि देशांतर्गत क्रिकेटमध्ये दमदार फलंदाजी केली होती. श्रेयसबाबत प्रश्न विचारला असता मुख्य निवडकर्ते अजित आगरकर यांनी स्पष्ट केलं होतं की, त्याची संघात जागा बनत नव्हती.**



इंग्लंड दौऱ्यासाठी श्रेयस अय्यरला भारतीय संघात स्थान का नाही मिळालं याचं कारण माजी भारतीय क्रिकेटपटू आकाश चोप्राने सांगितलं आहे. आकाश चोप्राच्या मते, भारतीय संघातील मध्यक्रमात स्थान मिळवण्यासाठी जोरदार स्पर्धा आहे. त्यामुळेच त्याला स्थान मिळण्याची शक्यता कमी झाली. इंग्लंडविरुद्ध दमदार पदार्पण करणारे सरफराज खान आणि ध्रुव जुरेल अजूनही आपल्या संधीच्या प्रतीक्षेत आहेत. त्यामुळे श्रेयसला आणखी वाट पाहावी लागेल. असं आकाश चोप्राने म्हटलं आहे.श्रेयस अय्यरने क्रिकेटच्या तिन्ही प्रकारात आपली छाप सोडली आहे. मात्र, त्याला कसोटी संघात आपलं हक्काचं स्थान मिळवण्यासाठी वाट पाहावी लागेल. इंग्लंड दौऱ्यासाठी त्याला स्थान मिळणं कठीण होतं. कारण काही खेळाडू आहेत जे आपल्या संधीच्या प्रतीक्षेत आहेत. करुण नायरला आता संधी मिळाली आहे. सरफराज आणि ध्रुवला संधी मिळायची आहे. असं असताना श्रेयसला संधी कशी मिळेल, असं आकाश चोप्रा म्हणाला.तसेच तो पुढे म्हणाला की, " मला माहीत आहे त्याने आयपीएल आणि देशांतर्गत क्रिकेटमध्ये दमदार कामगिरी केली आहे. त्याच्या नेतृत्वाखाली खेळताना पंजाब किंग्जने अंतिम फेरीत प्रवेश केला. त्याने मर्यादित षटकांच्या क्रिकेटमध्ये दमदार कामगिरी केली. त्याला कसोटी संघातही स्थान मिळेल, पण त्याला संयम ठेवावं लागेल."

असं मत आकाश चोप्राने व्यक्त केलं आहे.इंग्लंड दौऱ्यासाठी श्रेयस अय्यरला भारतीय संघात स्थान का नाही मिळालं याचं कारण माजी भारतीय क्रिकेटपटू आकाश चोप्राने सांगितलं आहे. आकाश चोप्राच्या मते, भारतीय संघातील मध्यक्रमात स्थान मिळवण्यासाठी

### त्याला संयम ठेवावं लागेल

त्याच्या नेतृत्वाखाली खेळताना पंजाब किंग्जने अंतिम फेरीत प्रवेश केला. त्याने मर्यादित षटकांच्या क्रिकेटमध्ये दमदार कामगिरी केली. त्याला कसोटी संघातही स्थान मिळेल, पण त्याला संयम ठेवावं लागेल." असं मत आकाश चोप्राने व्यक्त केलं आहे.भारतीय संघ सध्या इंग्लंड दौऱ्यावर आहे. दोन्ही संघांमध्ये पाच कसोटी सामन्यांची मालिका सुरू आहे. या दौऱ्यासाठी निवडण्यात आलेल्या संघात युवा खेळाडूंना संधी देण्यात आले आहे. ज्यावेळी भारतीय घोषणा करण्यात आली. त्यावेळी श्रेयस अय्यरचं नाव संघात नव्हतं. हे पाहून अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला. कारण श्रेयसने आयपीएल आणि देशांतर्गत क्रिकेटमध्ये दमदार फलंदाजी केली होती. श्रेयसबाबत प्रश्न विचारला असता मुख्य निवडकर्ते अजित आगरकर यांनी स्पष्ट केलं होतं की, त्याची संघात जागा बनत नव्हती.

जोरदार स्पर्धा आहे. त्यामुळेच त्याला स्थान मिळण्याची शक्यता कमी झाली. इंग्लंडविरुद्ध दमदार पदार्पण करणारे सरफराज खान आणि ध्रुव जुरेल अजूनही आपल्या संधीच्या प्रतीक्षेत आहेत. त्यामुळे श्रेयसला आणखी वाट पाहावी लागेल. असं आकाश चोप्राने म्हटलं आहे.श्रेयस अय्यरने क्रिकेटच्या तिन्ही प्रकारात आपली छाप सोडली आहे. मात्र, त्याला कसोटी संघात आपलं हक्काचं स्थान मिळवण्यासाठी वाट पाहावी लागेल. इंग्लंड दौऱ्यासाठी त्याला स्थान मिळणं कठीण होतं. कारण काही खेळाडू आहेत जे आपल्या संधीच्या प्रतीक्षेत आहेत. करुण नायरला आता संधी मिळाली आहे. सरफराज आणि ध्रुवला संधी मिळायची आहे. असं असताना श्रेयसला संधी कशी मिळेल, असं आकाश चोप्रा म्हणाला.तसेच तो पुढे म्हणाला की, " मला माहीत आहे त्याने आयपीएल आणि देशांतर्गत क्रिकेटमध्ये दमदार कामगिरी केली आहे.

# रविंद्र जडेजाला मिळू शकते संधी!

## दुसऱ्या कसोटी मालिकेतील दुसरा सामना एडबस्टनच्या मैदानावर रंगणार

**।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज।**

**भारत आणि इंग्लंड या दोन्ही संघांमध्ये ५ कसोटी सामन्यांची मालिका सुरू आहे. या मालिकेतील पहिला सामना लीड्सच्या मैदानावर पार पडला. या सामन्यात भारतीय संघाला पराभवाचा सामना करावा लागला. या विजयासह इंग्लंडने मालिकेत १-० ने आघाडी घेतली आहे. मालिकेतील दुसरा सामना एडबस्टनच्या मैदानावर रंगणार आहे.**

भारतीय संघाला जर हा सामना जिंकायचा असेल तर पहिल्या कसोटीत केलेल्या चुका सावरणं गरजेचं असणार आहे. दरम्यान दुसऱ्या कसोटीसाठी कशी असेल भारतीय संघाची प्लेइंग ११? जाणून घ्या.भारतीय संघातील टॉप ऑर्डरच्या फलंदाजांनी पहिल्या सामन्यात दमदार कामगिरी केली. दोन्ही डावात मिळून टॉप ऑर्डरच्या फलंदाजांनी ५ शतकं झळकावली. त्यामुळे सलामी जोडीत कुठलाही बदल होणार नाही. पहिल्या सामन्यातील शतकवीर केएल राहुल यशस्वी जैस्वालसोबत डावाची सुरूवात करू शकतो. पहिल्या सामन्यातील पहिल्या डावात यशस्वी जैस्वालने शतकी खेळी केली. तर दुसऱ्या डावात फलंदाजी करताना केएल राहुलने शतकी खेळी केली. त्यामुळे या



जोडीत कुठलाही बदल होणार नाही.पहिल्या कसोटी सामन्यात साई सुदर्शनला कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण करण्याची संधी मिळाली.

या सामन्यातील पहिल्या डावात तो शून्यावर माघारी परतला. तर दुसऱ्या डावात त्याला चांगली सुरूवात मिळाली, पण तो ३० धावा करत माघारी परतला. पहिल्या सामन्यात फ्लॉप ठरला असला तरीदेखील दुसऱ्या सामन्यात त्याला आणखी एक संधी दिली जाऊ शकते.शुबमन गिलने पहिल्या सामन्यात फलंदाजी करताना दमदार शतकी खेळी केली होती. त्यामुळे भारताचा कर्णधार या

### बुमराहला दुसऱ्या कसोटीत विश्रांती

. इंडियन एक्सप्रेसने दिलेल्या वृत्तानुसार, जसप्रीत बुमराहला दुसऱ्या कसोटीत विश्रांती दिली जाऊ शकते. जर बुमराहला विश्रांती दिली गेली तर, त्याच्या जागी डावखुऱ्या हाताचा वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंगला संधी दिली जाऊ शकते. तर मोहम्मद सिराज आणि प्रसिद्ध कृष्णा हे प्रमुख वेगवान गोलंदाज असू शकतात.

सामन्यातही चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करताना दिसेल. तर उपकर्णधार ऋषभ पंत या सामन्यातही पाचव्या क्रमांकावर फलंदाजी करताना दिसेल. ऋषभने पहिल्या सामन्यातील दोन्ही डावात शतकं झळकावली होती. ८ वर्षांनंतर भारतीय संघात पुनरागमन करत असलेला करुण नायर पहिल्या कसोटीतील दोन डावात फ्लॉप ठरला. मात्र, त्याचा अनुभव पाहता त्याला या सामन्यातही संधी दिली जाऊ शकते. तो सहाव्या क्रमांकावर फलंदाजीला येईल.संघातील सर्वात अनुभवी खेळाडू रविंद्र जडेजाला प्लेइंग ११ मध्ये स्थान मिळेल. तर दुसरीकडे शार्दुल ठाकूरला विश्रांती दिली जाऊ शकते. त्याच्या जागी नितीश कुमार रेड्डीला प्लेइंग ११ मध्ये संधी दिली जाऊ शकते

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज ™

ePaper

।सोमवार।
।दि. 30 जून 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती




Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046


Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
Powered by
JAI HIND EDUTECH
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
ADMISSION
OPEN
2025-2026
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
Computer Science
Crop Science
Electronics
Mechanical / Technical Automobile
Information Technology (IT)
For Commerce Stream
Banking
Marketing & Sales
Office Management
Small Industries & Self employment
Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241



BLOSSOM YOUR KNOWLEDGE

# Not just education, but
# Personality transformation.

ADMISSIONS OPEN for 2025-26

- CBSE curriculum
- Initiatives like 'Read-to-Lead'
- Tradition of 100% result

Gayatri English Medium School & Junior College, Charholi

95277 64646 / 77967 67292